ई-पेपर

जाहिरात

divyamarathi.com
Like 10k



# स्मरण आदर्श भारत सेवकाचे...

Ad Link

शोधा

जाहिरात

अभय टिळक | Feb 19, 2014, 00:08AM IST

Like 0 Tweet 0 +1 0



'आदर्श भारत सेवक' अशा यथार्थ बिरुदाने गौरवल्या जाणाऱ्या नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांच्या स्मृतिशताब्दी वर्षास आज, 19 फेब्रुवारीपासून प्रारंभ झाला. 19 फेब्रुवारी 1914 या दिवशी रात्री 10 वाजून 25 मिनिटांनी नामदार गोखले यांचे प्राणोत्क्रमण झाले. त्यानुसार आजपासून सुरू झालेल्या नामदार गोखले यांच्या स्मृतिशताब्दी वर्षाची सांगता 18 फेब्रुवारी 2015 रोजी होईल.

गोपाळ कृष्ण गोखले यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्यासारख्या समर्थ व खंद्या गुरूच्या मार्गदर्शनाखाली झाली. अत्यंत संस्कारक्षम वयात, म्हणजे वयाच्या 23व्या वर्षी गोखले न्यायमूर्तींच्या संपर्कात आले. ते वर्ष होते 1889. त्या आधी जवळपास 20 वर्षे (इ.स. 1870) स्थापन झालेल्या सार्वजनिक सभेचे एक कार्यकर्ते शिवराम हरी साठे यांच्यापाशी गोखले यांची शिफारस गोपाळ गणेश आगरकरांनी केली आणि त्यानुसार गोखले यांची ओळख साठ्यांनी न्यायमूर्तींशी करून दिली. राजकारणाची आवड गोखल्यांना पहिल्यापासूनच होती. तिला व्यासंगाची जोड देण्याचा संस्कार गोखल्यांवर घडवला न्या. रानडे यांनी. 1890मध्ये सार्वजनिक सभेच्या चिटणीसपदावर गोपाळ कृष्ण गोखले यांची निवड झाली. सार्वजनिक सभेची सूत्रे मवाळांच्या हातातून टिळकांनी त्यांच्या ताब्यात घेतल्यानंतर 1896च्या दिवाळीत 31 ऑक्टोबर 1896 रोजी न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी डेक्कन सभा ही संस्था स्थापन केली. हिंदुस्थानचा कारभार चालवण्यासाठी ब्रिटिश सरकार वाढत्या मात्रेने करत असलेल्या खर्चाचा मुद्दा त्या वेळी चांगलाच गाजायला लागलेला होता. या खर्चाचा बोजा हिंदुस्थानच्या माथ्यावर चढू लागल्याने तो भागवण्यासाठी सरकार करत असलेल्या कर आकारणीपायी हिंदी जनतेवर उपासमारीचे उग्र संकट ओढवत असल्याचे प्रतिपादन दिनशा वाच्छा व नवरोजींसारखे ज्येष्ठ नेतेगण उच्चरवाने तेव्हा करत होते. या सगळ्याच प्रश्नांबाबत अभ्यास करण्यासाठी लॉर्ड वेल्बी यांच्या अध्यक्षतेखाली 1895मध्ये एक आयोग स्थापन केला गेला. या आयोगापुढे साक्ष देण्यासाठी डेक्कन सभेच्या वतीने गोखले यांना पाठवण्याचे निश्चित झाले. हे ठरल्यानंतर रानडे व जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली गोखले यांनी अत्यंत मेहनतीने कसून तयारी केली; परंतु साक्ष देण्याकरिता इंग्लंडला बोटीने जाण्यासाठी 5 मार्च 1897 रोजी मुंबई सोडेपर्यंत साक्षीचा मसुदा तयार करण्यास गोखले यांना वेळच मिळाला नाही. अखेर 20 मार्च 1897 रोजी लंडनला पोहोचेपर्यंत प्रवासातच गोखले यांनी 186 छापील पानांची साक्ष लिहून पूर्ण केली. लंडनला पोहोचल्यानंतर दादाभाई नवरोजी आणि लॉर्ड वेडरबर्न यांनी ती अतिशय बारकाईने वाचली. त्या मसुद्यात काडीचाही फेरफार वा सुधारणा करण्याची गरज त्या दोघांनाही वाटली नाही. तसे त्यांनी रानडे व जोशी यांना कळवलेही. एप्रिल 1897 मध्ये वेल्बी आयोगासमोर गोखले यांनी दिलेली साक्ष ही अत्यंत प्रभावी व अभ्यासपूर्ण अशीच झाली. गोखले यांच्या त्या पुढील राजकीय तसेच वैचारिक कारकीर्दीची पायाभरणी या साक्षीद्वारे घडून आली.

देशसेवेची प्रबळ व प्रामाणिक ऊर्मी असणाऱ्या तरुणांची संस्था म्हणून गोखले यांनी या संस्थेचे नाव इंग्रजीत ठेवले 'सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी.' तिचे मराठी रूप 'भारत सेवक समाज' असे होते, तेच पुढे 'हिंद सेवक समाज' असे झाले. कोणत्याही विषयाचा औरसचौरस आणि पुरेसा अभ्यास केल्याखेरीज त्याबाबत न बोलण्याचा वेल्बी आयोगासमोरील साक्षीच्या वेळी अंगीकारलेला दंडक गोखले यांनी संपूर्ण आयुष्यभर पाळला. त्यामुळे हिंद सेवकांच्या उमेदवारीची पहिली पाच वर्षे ही केवळ अभ्यासाकरिता ठेवलेली होती. देशाची सेवा करण्यासाठी उद्युक्त होणाऱ्या हिंद सेवकाने अभ्यास करायचा, तर त्यासाठी अभ्यासाची साधनसामग्री संस्थेपाशी हवी, हे जाणून हिंद सेवक समाजाचे सुसज्ज ग्रंथालय निर्माण करण्याचा दीर्घोद्योग गोखले यांनी अतिशय जाणीवपूर्वक केला. हिंद सेवकांनी त्यांच्या त्यांच्या अभ्यासविषयाचा व्यासंग जोपासत असतानाच, संस्थेमध्ये आठवड्यातून दोनदा भरणाऱ्या चर्चा-सभांपैकी एका सभेत निबंधवाचन करणे, तर दुसऱ्या सभेदरम्यान वादविवादातून सहभागी होणे नियमाने बंधनकारक होते. पुस्तकी अभ्यासाला जोड म्हणून नव्याने संस्थेत येणाऱ्या हिंद सेवकाने किमान एक वर्ष देशभर हिंडून देशस्थितीचा अभ्यास करावा, असा दंडक असे. या प्रवासादरम्यान त्याने उपदेश अथवा भाषणे करावयाची नाहीत, अशीही संस्थेची शिस्त होती. समाजसेवेसाठी उत्सुक असणाऱ्यांनी प्रथम व्यासंगाचा पाया आपल्या ठिकाणी भक्कम केला पाहिजे, ही प्रेरणा समाजात रुजवण्यासाठी संस्थात्मक पातळीवर प्रयत्न करण्याचा खटाटोप करणाऱ्या आदर्श भारतसेवक गोपाळ कृष्ण गोखले यांच्या अपेक्षेचे किमान स्मरण तरी त्यांच्या स्मृतिशताब्दी वर्षात आपण ठेवणार का, हाच खरा प्रश्न आहे.

## ठळक बातम्या


मारुती, ह्युंदाई, महिंद्राच्या कार, हीरोच्या बाइक स्वस्त


पंतप्रधानांचे हत्यारे सुटले तर गरिबांचे काय? असे राहुल म्हणताच केंद्र खडबडून जागे


डोळ्यात मिरचीची पूड फेकून 18 महिलांनी केले पलायन

## वाचकांची आवड


बॉलिवूडचा एक काळ गाजवणा-या या या सौंदर्यवती आता दिसतात काहीशा अशा, बघा PHOTOS


महाशिवरात्री : शिवमहापुराणातील या 13 उपायांनी उजळेल भाग्य


या 5 वस्तू आहेत खूप खास, पाकिटात ठेवल्यास भासणार नाही आर्थिक अडचण

## रंजक बातम्या


बॉलिवूडचा एक काळ गाजवणा-या या या सौंदर्यवती आता दिसतात काहीशा अशा, बघा PHOTOS


जाणून घ्या 'फँड्री'साठी नागराज मंजुळेंना कसे गवसले जब्या,